# 11th AYURVEDA DAY 2026

केसरी
: www.dailykesari.com

पिंपरी-चिंचवड

पुणे, २५ सप्टेंबर २०२६
: @kesarinewspaper



## निगडीत आयुर्वेद दिन उत्साहात साजरा



**पिंपरी :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे आयुर्वेद महाविद्यालय व संशोधन केंद्र तथा संलग्नित आयुर्वेद रुग्णालय व स्नोबेल मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, निगडी येथे राष्ट्रीय आयुर्वेद दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने महाविद्यालय व रुग्णालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयात धन्वंतरी पूजन प्राचार्या डॉ.रागिणी पाटील यांच्या हस्ते झाले. रुग्णालयात मोफत आरोग्य शिबिर, रक्त तपासणी शिबिर, औषधी वनस्पती तसेच आयुर्वेदिक औषधींचे वाटप करण्यात आले.

आयुर्वेद दिनाचे औचित्य साधून गेल्या महिनाभरापासून महाविद्यालय व रुग्णालयातर्फे विविध आरोग्य शिबिरे, मोफत तपासण्या, सुवर्णप्राशन, वैद्यकीय परिषद, औषधी वनस्पती प्रदर्शन, आरोग्यदायी पाककृती प्रदर्शन तसेच विविध स्पर्धांचा समावेश महाविद्यालयातील विभागांमार्फत करण्यात आला.

या संपूर्ण महिनाभरातील उपक्रमांना नागरिकांचा व विद्यार्थ्यांचा अत्यंत उत्तम प्रतिसाद लाभला.याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. आरती फिरके व डॉ मिलिंद मोकाशी व यांचे मार्गदर्शन लाभले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयातील कायचिकित्सा विभाग व रुग्णालयीन व्यवस्थापनातर्फे करण्यात आले होते. उद्याच्या उत्तम आरोग्यासाठी आयुर्वेद सर्वांनी जोपासावा असे आवाहन प्राचार्यांनी केले.